**ठळक बातम्या**

- महायुतीचं सरकार महिला, शेतकरी, युवक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे, अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- कच्च्या खाद्य तेलावर २० टक्के आणि सूर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- कांद्याच्या निर्यातीवरची किमान मर्यादा दर हटवल्यानंतर नाशिक जिल्ह्यातल्या घाऊक बाजारात कांद्याचे भाव वधारले

- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला सर्व प्रकारची मदत दिली जाईल, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांची ग्वाही

**आणि**

- मुंबई विमानतळावर गेल्या दोन दिवसात तस्करीचं साडेसात किलो सोनं जप्त

**<><><><><>**

महायुतीचं सरकार महिला, शेतकरी, युवक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. धाराशिव जिल्ह्यात परांडा इथं मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमात आज ते बोलत होते. शासनानं सुरू केलेली लाडकी बहिण योजना यशस्वी झाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित

पवार आणि आपण एकसंघपणे महिलांच्या कल्याणासाठी काम करत असल्याचं ते म्हणाले. ज्या महिलांच्या खात्यात अद्याप योजनेचे पैसे जमा झाले नाहीत, ते येत्या ३० सप्टेंबर पूर्वी जमा करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. ही योजना थांबणार नसून दर महिन्याला महिलांच्या खात्यात दीड हजार रुपये जमा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. धाराशिव जिल्ह्याच्या हक्काचं पाणी उजनीतून सीना कोळेगाव प्रकल्पात आणण्यासाठी लवकरच बैठक घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><>**

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अधिक सक्षम करण्याकरता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडकी बहिण योजना कुटुंब भेट अभियानाला धुळे शहर आणि जिल्ह्यात देखील सुरुवात झाली आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं कच्च्या खाद्य तेलावर २० टक्के आणि सूर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू केलं आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार या तेलांवर या पुढे ३५ टक्के आयात शुल्क द्यावं लागणार आहे. या बरोबरच अन्नधान्य महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्यावर्षी लागू केलेले बासमती तांदूळ आणि कांद्यावरचं किमान निर्यात मूल्य रद्द करण्याचा निर्णयही घेतला आहे.

या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत. यानिर्णयाचा फायदा अप्रत्यक्षपणे कापूस उत्पादकांना होईल असं फडणवीस यांनी नागपूरात प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितलं.

याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले…

**होल्ड - देवेंद्र फडणवीस**

भारतीय किसान संघनं आयात शुल्क वाढवण्याच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि कर्नाटक या तेलबिया उत्पादक राज्यांमध्ये सोयाबीनला ६ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा या मागणीसाठी आंदोलन सुरु आहे.

**<><><><><>**

कांद्याच्या निर्यातीवर किमान दर मर्यादा हटवल्यानं तसंच निर्यात शुल्क निम्म्यानं कमी केल्यानंतर नाशिक जिल्ह्यातल्या घाऊक बाजारात कांद्याचे दर क्विंटल मागे ४०० ते ५०० रुपयांनी वधारले आहेत. लासलगाव बाजारात आज चांगल्या प्रतीच्या कांद्याला सरासरी ४ हजार ६०० रुपये दर मिळाला.लोकसभा निवडणुकीवेळी केंद्र सरकारनं कांद्यावरची निर्यात बंदी उठवली होती. मात्र, प्रति मेट्रीक टन ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य आणि

४० टक्के निर्यात शुल्क कायम ठेवल्यानं शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. आता केंद्र सरकारनं किमान निर्यात मूल्याचे बंधन हटवत आणि निर्यातीचं ४० टक्के निर्यात शुल्क २० टक्क्यांवर आणलं. या निर्णयानंतर लासलगाव बाजार समितीत पाच हजार क्विंटल कांद्याची आवक झाली. आवक झालेल्या कांद्याला किमान ३ हजार ७००, कमाल ४ हजार ७०० आणि सरासरी ४ हजार ६०० रुपये दर मिळाले. काल याच बाजार समितीत कांद्याला सरासरी ४२०० रुपये क्विंटल भाव मिळाला होता.

<><><><>

केंद्र सरकारनं गव्हाचे व्यापारी, घाऊक व्यापारी त्याचप्रमाणे किरकोळी ने विक्री करणाऱ्या साखळी दुकानांना गव्हाची साठवण करण्यावरचे निर्बंध वाढवले आहेत. आधी हे व्यापारी ३ हजार टन गव्हाची साठवणूक करु शकत होते, आता त्यांना केवळ दोन हजार टन गहू साठवता येणार आहे.

<><><><>

राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहचला आहे. येत्या १७ तारखेला अनंत चतुर्दशीच्या दिवशी १० दिवसांच्या गणपतीचं विसर्जन होईल. पण त्यापूर्वी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी राज्यात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज मुंबईतल्या प्रसिद्ध गणपतींचं दर्शन घेतलं. मुंबईतला पहिला सार्वजनिक गणपती केशवजी नाईक चाळ,

लालबागचा राजा, मुंबई सेंट्रलच्या हमाल मंडळाचा गणपती यांचा त्यात समावेश होता.

भाजपा अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज लालबागचा राजा, चिंचपोकळीच्या चिंतामणी आणि वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सवाला भेट देऊन गणपतीचं दर्शन घेतलं.

अंधेरीच्या विद्या विकास मंडळ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आज 'अंधेरीचा राजासाठी गणपती अथर्वशीर्ष पठण केलं.

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातल्या कवडी इथल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक उत्सव साजरा केला. फुले, शंख-  शिंपले, वेगवेगळ्या झाडांची पाने, रंगीत दगड, शेंगांची टरफले अशा मोफत आणि सहज उपलब्ध होणाऱ्या साधनांचा वापर करून गणेशाचे विविध भाव दर्शवणारं कोलाज साकारण्यात आलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, स्वीडनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

ईद ए मिलाद म्हणजेच प्रेषित महंमदांच्या जयंती निमित्त अनेक ठिकाणी मुस्लीम समाजातर्फे जुलूस काढण्यात येतात. मात्र यंदा येत्या मंगळवारी १७ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी असून गणेशविसर्जनाची धामधूम लक्षात घेता सलोखा राखण्याच्या दृष्टीनं मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी बुधवारी १८ सप्टेंबरला जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने १६ सप्टेंबरला घोषित केलेली ईद ए मिलादची सुटी मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यात १८ सप्टेंबरला देण्याचा निर्णय प्रशासनानं घेतला आहे. इतर जिल्ह्यांत संबंधित जिल्हाधिकारी वातावरण लक्षात घेऊन सुट्टीबाबतचा निर्णय घेतील असं शासकीय पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला सर्व प्रकारची मदत दिली जाईल, कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज मुंबईत पारसी समुदायाच्या एका कार्यक्रमात बोलत होते. पारसी समाजाची घसरती लोकसंख्या हे या समुदायासमोरचं सर्वात मोठं आव्हान असून त्याचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार ‘जियो पारसी’ योजना राबवत असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. पारसी समुदायाची लोकसंख्या ५०

हजाराच्या खाली येऊ नये, यासाठी तातडीनं पावलं उचलण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

वक्फ सुधारणा विधेयकाबद्दल कुणाच्याही मनात कोणताही संभ्रम असण्याची गरज नाही. काही लोक या विधेयकाला विरोध करत असले, तरी बहुतेक मुस्लिम बांधवांनी या विधेयकाला समर्थन दिलं आहे, असा दावा रिजिजू यांनी यानंतर वार्ताहरांशी बोलताना केला. देशात सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, मात्र या विधेयकाबद्दल खोट्या गोष्टी पसरवून कुणीही नागरिकांची दिशाभूल करू नये, असंही ते म्हणाले.

रिजिजू यांनी आज  ‘भगवान बुद्ध यांच्या मध्यम मार्गाद्वारे भविष्यातील जागतिक नेतृत्वासाठी मार्गदर्शन’ या विषयावरच्या परिषदेला संबोधित केलं. परोपकार आणि करुणा ही बुद्धांची शिकवण अंगिकारल्यावरच देशाला जगाचं नेतृत्व करता येईल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावरुन गेल्या दोन दिवसात तस्करी करुन आणलेलं साडेसात किलो सोनं जप्त करण्यात आलं असून त्याची बाजारातली किंमत ५ कोटी रुपयांहून अधिक असल्याची माहिती विमानतळ झोन ३ च्या पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे. सोने तस्करीच्या एकूण ७ प्रकरणांमध्ये ही जप्ती करण्यात आली असून या प्रकरणी ८ जणांना अटक करण्यात आली

आहे. यामध्ये विमानतळ प्राधिकरणाच्या ६ कंत्राटी कामगारांचा तसंच दुबई आणि मादागास्करहून आलेल्या प्रवाशांचा समावेश आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये गेल्या दोन दिवसांपासून जोरदार पाऊस झाला. यात शहरातल्या काजी गढी भागातली तीन ते चार घरं ढासळली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**<><><><><>**

**हवामान/ पत्रक/ गौरी**

येत्या २ दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी तर विदर्भ, मराठवाडा आणि मध्यमहाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**